# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/१०/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

**पोस्टे बेला अंतर्गत आगामी विधानसभा निवडणूक अनुशंगाने रूटमार्च**

आज दि. २८/१०/२४ रोजी श्री. दीपक अग्रवाल (भा.पो.से) मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांचे मार्गदर्शना खाली पोलीस स्टेशन बेला हद्दीतील ओपी सिर्सी चौकी येथे रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्च करीता पो.स्टे. बेला येथील ठाणेदार श्री. सी. बी. चौहाण, ०२ पोलीस अधिकारी व १६ पोलीस अंमलदार तसेच सीमा सुरक्षा दल १४ जवान हजर होते.







## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २७/१०/२०२४ रोजी पो. स्टे. कन्हान हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना अशोक लेलॅन्ड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त चारचाकी वाहन क्रं. एम एच–४०, सी टी–५००७ मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा सालवा पेट्रोल पंप कन्हान येथे नाकाबंदी दरम्यान अशोक लेलॅन्ड वाहनास थांबण्याचा इशारा केला असता सदर वाहन चालकाने आपले वाहन न थांबवता वाहन रोडचे कडेला उभे करून वाहन सोडुन घटनास्थळाहुन पसार झाले. घटनास्थळी वाहन क्रं. एम एच–४०, सी टी–५००७ ची पाहणी केली असता वाहनामध्ये ११ गोवंशिय बैल जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने अशोक लेलॅन्ड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त चारचाकी वाहण क्रं. एमएच–४०,सीटी–५००७ मध्ये मागील डाल्यात ११ गोवंश बैल किंमती प्रत्येकी २०००० रू प्रमाणे एकुण २,२०,००० रू व चार चाकी वाहण किंमत ५,००,०००रू असा एकुण ७,२०,००० रू चा माल मिळुन आल्याने जप्त केला असुन **आरोपी**

**अशोक लेलॅन्ड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त चारचाकी वाहण क्रं. एमएच–४०, सीटी–५००७ चा फरार चालक व मालक** यांचे विरूद्ध कलम ११(१),(ड), ५(१),(२) प्राण्याचा छळ प्रति. अधि.१९६० सह.क.९ महा. पशु संरक्षण अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग विभाग श्री. संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि राजेंद्र पाटील यांनी केलेली आहे.

## पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगाव पारधी बेडा परिसरात

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २८/१०/२०२४ रोजी पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगाव पारधी बेडा परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारी महिला आरोपी ही मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आली. आरोपीचे ताब्यातून १) दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ३० लिटर मोहफुल गावठी दारू किमती ३,०००/—रु २) ५ मोठे प्लास्टिक ड्रम मध्ये मोहाफुल रसायन सडवा एकूण १,०००/— लिटर प्रत्येकी ३५/—रू लिटर प्रमाणे एकूण किमती ३५,०००/— रु ३) भट्टी काढण्याचे साहित्य किंमती ३,०००/—रु ४) जळावु लाकुड २ टन अंदाजे कि. १,०००/—रू. ५) २ प्लॅस्टीक डबकी किंमती २००/—रू. ६) ५ ड्रम किंमती १०००/—रू. प्रमाने एकुण ५,०००/—रू. व इतर दारू गळण्याचे साहित्य असा एकूण ५१,४००/— रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे काटोल यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी आशिष सिंग ठाकूर, पोहवा इकबाल शेख, पोहवा राजू रेवतकर, पोहवा रवींद्र चटप, चापोहवा राहुल पाटील, मपोहवा वनिता शेंडे या पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर